महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. ०१९ २२२१८०० Website : www.mahaawaas.org
Email ID : directoriayruralhousing@gmail.com Maha Awaas :

**क्र.राव्यक-ग्रागृ/आय.टी./इंआयो-बैठक/३९९/२०२४** **दि. २९/०२/२०२४**

प्रति,
**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- इंदिरा आवास योजनेतील घरकुलांबाबत आढावा बैठक.**

इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वीची भौतीकदृष्ट्या पूर्ण असलेली पंरतु आर्थिकदृष्ट्या अपूर्ण असलेल्या घरकुलांची Single Page Entry Module मध्ये नोंदणी करण्यात आलेल्या घरकुलांना अद्यापर्यंत हप्ते वितरीत करण्यात आलेले नाहीत. तसेच इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१५-१६ मधील अपूर्ण घरकुलांबाबत या कार्यालयाकडून वारंवार पाठपुरावा होऊनही सदर घरकुले अपूर्ण असल्याचे दिसून येत आहे. याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सद्यास्थितीत इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वीची भौतीकदृष्ट्या पूर्ण असलेली पंरतु आर्थिकदृष्ट्या अपूर्ण असलेल्या २६,००९ घरकुलांची Single Page Entry Module मध्ये नोंदणी करण्यात आलेल्या घरकुलांना अद्यापर्यंत हप्ते वितरीत करण्यात आलेले नाहीत. तसेच इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील ११,३३१ इतक्या अपूर्ण घरकुलांचा आढावा घेण्यासाठी, उपायुक्त (विकास), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत समिती), विभागीय प्रोग्रॅमर, जिल्हा प्रोग्रॅमर व तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या विभागनिहाय बैठका खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्ह्याचे नाव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | नंदुरबार | दि.०४.०३.२०२४ | स. ११.०० ते दु. ०१.३० वा. |
| | | जळगाव | | |
| | | नाशिक | | |
| | | अहमदनगर | | |
| | | धुळे | | |
| २ | अमरावती | अमरावती | दि.०४.०३.२०२४ | दु. ०२.३० ते सायं. ०५.०० वा. |
| | | अकोला | | |
| | | बुलढाणा | | |
| | | यवतमाल | | |
| | | वाशिम | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | पुणे | सांगली | दि.०६.०३.२०२४ | स. ११.०० ते दु. ०१.३० वा. |
| | | सोलापूर | | |
| | | पुणे | | |
| | | सातारा | | |
| | | कोल्हापूर | | |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | नांदेड | दि.०६.०३.२०२४ | दु. ०२.३० ते सायं. ०५.०० वा. |
| | | छत्रपती संभाजीनगर | | |
| | | बिड | | |
| | | हिंगोली | | |
| | | धाराशिव | | |
| | | लातुर | | |
| | | परभणी | | |
| | | जालना | | |
| ५ | नागपूर | नागपूर | दि.०७.०३.२०२४ | स. ११.०० ते दु. ०१.३० वा. |
| | | गोंदिया | | |
| | | गडचिरोली | | |
| | | भंडारा | | |
| | | चंद्रपुर | | |
| | | वर्धा | | |
| ६ | कोंकण | पालघर | दि.०७.०३.२०२४ | दु. ०२.३० ते सायं. ०५.०० वा. |
| | | रत्नागिरी | | |
| | | सिंधुदुर्ग | | |
| | | रायगड | | |
| | | ठाणे | | |

तरी सदर बैठकीस आपले अधिनस्त असलेले प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत समिती), विभागीय प्रोग्रॅमर, जिल्हा प्रोग्रॅमर व तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरुन सूचित करावे, ही विनंती.

सदर जिल्हानिहाय बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात येणार असून, याकरिता आवश्यक लिंक आपणांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत:**

१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
५. गट विकास अधिकारी (पंचायत समिती), जिल्हा परिषद, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.